# आमच्या पाशी योजना ए आणि योजना बी देखील आहे.



| फायदे | योजना ए | योजना बी |
|---|---|---|
| उपलब्ध विमा रकमेचे पर्याय | ₹3 लाख, ₹6 लाख, ₹9 लाख | ₹12 लाख, ₹15 लाख, ₹18 लाख |
| स्थानिक रोड रूग्णवाहिका | ₹1,500 पर्यंत | ₹3,000 पर्यंत |
| पॉलिसी सेवेची खात्री | पॉलिसी जारी करण्यास उशिरासाठी हमी रक्कम ₹10,000 | पॉलिसी जारी करण्यास उशिरासाठी हमी रक्कम ₹20,000 |
| दावामुक्त नूतनीकरणासाठी अपघाती मृत्यू संरक्षण | लागू नाही | ₹1 लाख व्यक्तिगत अपघात – पॉलिसीधारक – विमित व्यक्ती यांच्यासाठी मृत्यू संरक्षण |
| विम्याचे नूतनीकरण | लागू नाही | पॉलिसीधारक किंवा विमित व्यक्तीला नमूद केलेले किचकट आजार झाल्यास एकदा नूतनीकरण प्रिमियम रद्द |
| रूग्णालयपूर्व व पश्चात खर्च | 60 दिवसापर्यंत | |
| मूळ हमी रक्कम पूर्ववत करा | मूळ हमी रकमेच्या 100% पर्यंत पूर्ववत करा, संबंधित आजार/ईजेच्या 20%च्या उपमर्यादेच्या अधीन | |
| रूग्णालयातील खर्च<br>ए) आंतररूग्ण उपचार<br>बी) दिवससेवा उपचार | विमा रकमेपर्यंत संरक्षण | |
| दात्याचा खर्च | मूळ विमा रकमेच्या 50% पर्यंत संरक्षण, जास्तीत जास्त रू.5 लाख च्या अधीन | |
| डोमिसिलिअरी रूग्णालय खर्च | मूळ विमा रकमेच्या 10% पर्यंत संरक्षण, जास्तीत जास्त रू.50,000 च्या अधीन | |
| स्वास्थ्य | होय | |
| संचयित बोनस | प्रत्येक दावामुक्त वर्षासाठी 33.33% वाढ, जास्तीत जास्त 100%. प्रत्येक दावासह वर्षासाठी 33.33% घट, जास्तीत जास्त मिळालेल्या संचयित बोनस इतकी. | |
| कॉल पर्याय*# | कमाल विमा रक्कम (मूळ+संचयित बोनस) ही मूळ हमी रकमेच्या किमान चार पट (पहिल्या पॉलिसी कालावधी अंतर्गत) किंवा ₹50 लाख इतकी असेल. याचा 60 वर्ष होईपर्यंत अवलंब करता येईल. कॉल ऑप्शनचा अवलंब केल्यास त्यासाठी अधिक प्रिमियम भरावी लागेल. | |
| दाव्यासाठी खात्रीशीर सेवा | कॅशलेस दाव्याच्या बाबतीत – सर्व माहिती/दस्तऐवज मिळाल्यानंतर कामकाजाच्या 6 तासांपेक्षा अधिक उशीर झाल्यास दाव्याच्या रकमेच्या 1% पर्यंत व जास्तीत जास्त 6% पर्यंत रक्कम दिली जाते.<br>प्रतिपूर्तीच्या दाव्याच्या बाबतीत – सर्व माहिती/दस्तऐवज मिळाल्यानंतर कामकाजाच्या 21 दिवसांपेक्षा अधिक उशीर झाल्यास दाव्याच्या रकमेच्या 1% पर्यंत व जास्तीत जास्त 6% पर्यंत रक्कम दिली जाते. | |
| आयुष उपचार | विमा रकमेच्या 100% पर्यंत संरक्षण | |
| आधुनिक उपचार | विमा रकमेच्या 50% पर्यंत संरक्षण | |

*#प्रत्येक ओळीने 4 दावामुक्त पॉलिसी वर्षांच्या अखेरीस एकदा

## तुमच्या पात्रतेचे निकष तपासून पहा

| फायदे | योजना ए | योजना बी |
|---|---|---|
| प्रवेशाचे वय-कमाल | 65 वर्ष,<br>₹3 लाख विमा रकमेसाठी प्रवेशाची वयोमर्यादा नाही | 65 वर्ष |
| प्रवेशाचे वय-किमान | अवलंबित मुलांना** फ्लोटर योजनेत 91 दिवस ते 25 वर्ष वयापर्यंत संरक्षण देता येऊ शकते. जर 18 वर्षाहून अधिक वयाची एक व्यक्ती प्रस्तावकर्ता असेल तर 5 वर्षापेक्षा अधिक वयाच्या बालकांना व्यक्तिश: संरक्षण देता येते. | |
| बाहेर पडण्याचे वय | वयाची मर्यादा नाही. ही पॉलिसी दीर्घकालीक नूतनीकरण देते | |
| व्यक्तिगत पॉलिसी | एकाच पॉलिसीत जास्तीत जास्त 6 पर्यंत सदस्यांना संरक्षण देता येईल | |
| फ़्लोटर पॉलिसी | एकाच फ्लोटरमध्ये जास्तीत जास्त 6 पर्यंत सदस्यांना संरक्षण देता येईल = 4 (मुले) + 2 (प्रौढ) | |
| पॉलिसी जारी करण्यापुर्वी वैद्यकीय तपासणी | >= 46 वर्ष | >= 18 वर्ष |

## अटी लागू

| | |
|---|---|
| रूमची पात्रता | एकेरी खाजगी रूम# |
| सह-भरणा | दाव्याच्या रकमेच्या 20%<br>फ्लोटर पॉलिसीत: सर्व विमीत व्यक्तींसाठी, प्रवेशाचे वेळी सर्वाधिक वयस्क व्यक्तीचे वय 61 वर्ष किंवा अधिक असल्यास. व्यक्तिगत पॉलिसीसाठी: विमित व्यक्तींसाठी ज्यांचे वय प्रवेशाचे वेळी 61 वर्ष किंवा अधिक आहे. |
| पॉलिसीचा कालावधी | 1 वर्ष किंवा 2 वर्ष |

## प्रतिक्षा कालावधी

| | |
|---|---|
| पहिले 30 दिवस प्रतिक्षा कालावधी | अपघाताच्या दाव्याव्यतिरिक्त कोणत्याही आजारावरील उपचारांसाठी पॉलिसीच्या प्रारंभाच्या तारखेपासून 30 दिवस |
| अगोदरच असलेल्या रोगासाठी प्रतिक्षा कालावधी | पीईडीवरील उपचारांसाठीच्या खर्चासाठी 3 वर्षांचा प्रतिक्षा कालावधी. पहिल्या पॉलिसीच्या प्रस्थापनेच्या तारखेपासून ओळीने 36 महिने संरक्षण आवश्यक आहे. |
| खास प्रतिक्षा कालावधी + | ठराविक रोगांसाठी 2 वर्षांचा प्रतिक्षा कालावधी लागू आहे. पहिल्या पॉलिसीच्या प्रस्थापनेच्या तारखेपासून ओळीने 24 महिने संरक्षण आवश्यक आहे. |

रिलायन्स हेल्थ गेन पॉलिसी UIN: RELHLIP21514V022021

## पॉलिसीमध्ये या व्यतिरिक्त सर्व काही समाविष्ट आहे^

रिलायन्स जनरल इन्शूरन्स मध्ये आम्ही पारदर्शकतेवर विश्वास ठेवतो. तुम्हाला दावा करताना कोणत्याही आश्चर्याच्या धक्याला सामोरे जावे लागू नये यासाठी, पॉलिसीतील काही महत्त्वाच्या वगळण्याच्या मुद्यांवर नजर टाका.

- तपासण्या आणि मूल्यमापने/स्वास्थ्य आणि पूर्ववत होणे
- डाएटरी सप्लिमेंटस आणि पदार्थ
- अपघात/भाजणे किंवा कर्करोग याव्यतिरिक्त कॉस्मेटिक किंवा प्लॅस्टिक सर्जरी
- धोकादायक किंवा साहसी खेळ
- कायदा भंग
- अंमली पदार्थ आणि अल्कोहोल
- 7.5 डायपट्रे पेक्षा कमी रिफ्रॅक्टिव एरर
- निरोधक आणि वंध्यत्व
- प्रसुतीचा खर्च
- दातांचे उपचार
- जन्मत: बाह्य दोष
- ॲलोपथी व्यतिरिक्त इतर/आयुष व्यतिरिक्त उपचार
- स्वत: केलेली ईजा किंवा आत्महत्या
- अणू हल्ला/युद्ध

टीप: प्रस्तावाच्या दिवशी पॉलिसीच्या प्रस्तावकर्त्याचे वय किमान 18 वर्ष असले पाहिजे.
#तुमच्या पॉलिसीत तुम्हाला 'एकेरी खाजगी रूम' साठी संरक्षण देण्यात आले आहे. तुम्ही पात्र गटाहून अधिक उच्च दर्जाच्या गटातील निवासासह दाखल झाल्यास, तुम्हाला समाविष्ट वैद्यकीय खर्चाचा वरील खर्च सोसावा लागेल.

+रोगांच्या तपशीलवार यादीसाठी, माहितीपत्रक/वेबसाईटवर www.reliancegeneral.co.in येथे उपलब्ध असलेले पॉलिसीचे शब्दांकन वाचा.

**नैसर्गिकरित्या किंवा कायदेशिररित्या दत्तक घेतलेले आणि आर्थिक बाबतीत प्रस्तावकर्त्यावर अवलंबित.

^ही यादी निर्देशक स्वरूपाची आहे. सर्वसाधारण आणि कायमस्वरूपी वगळण्याचे मुद्दे समजून घेण्यासाठी माहितीपत्रक/वेबसाईटवर www.reliancegeneral.co.in येथे उपलब्ध असलेले पॉलिसीचे शब्दांकन वाचा.

Digital India Power To Empower | RELIANCE GENERAL INSURANCE | CSC e-Governance Services India Limited

हेल्थ इन्शूरन्स

# रिलायन्स हेल्थ गेन पॉलिसी

## सुलभ वैद्यकीय विमा देणारे एकमेव ठिकाण

Tech+ ❤ = Live Smart





आरोग्य ही धनसंपदा आहे आणि ती जपली पाहिजे. परंतु अतिशय घाईगर्दीची जीवनशैली, हवा प्रदूषण, अभूतपूर्व फ्लूचा संसर्ग, किंवा काही चुकीची पावले टाकल्यामुळे तुमच्या बाबतीत वैद्यकीय आणीबाणीचे पसंग निर्माण होऊ शकतात. आजारातून लवकर बरे होण्यासाठी तुम्ही करत असलेली प्रार्थना आणि तुमची जलद कॅशलेस दावा निराकरणाची गरज या दोन्ही गोष्टी आम्ही समजू शकतो. आणि म्हणूनच रिलायन्स जनरल इन्शुरन्समध्ये आम्ही आपल्यासाठी एक असे विमा संरक्षण सादर करीत आहोत ज्यामध्ये तुमच्या आरोग्याच्या गरजांची जाणीव असलेल्या मनापासून जलद सहाय्यासाठी तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**रिलायन्स हेल्थ गेन पॉलिसी म्हणजे Tech + ❤ सह Live Smart चा नवा मार्ग.**

## आमची निवड करण्याची 5 असाधारण कारणे

### सुलभ वैद्यकीय विमा (ईएमआय)

जेव्हा तुम्ही विम्याचे संरक्षण विकत घेता तेव्हा तुमच्या निदर्शनास येणारी पहिली गोष्ट असते प्रीमियम आणि बहुतेक व्यक्ती कमी विमा रक्कम किंवा कमी वार्षिक प्रीमियमची निवड करतात. आम्ही तुमचा निर्णय घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी केली आहे, रिलायन्स हेल्थ गेन पॉलिसी सुलभ मासिक आणि तिमाही प्रीमियमच्या हप्त्यांमध्ये उपलब्ध आहे. तेव्हा तुम्हाला योग्य वाटणाऱ्या विमा रकमेची आणि ईएमआयची निवड करा.

### रीस्टोर करा, रिफील करा, रिचार्ज करा.

जर एखाद्या वैद्यकीय दाव्यांमध्ये तुमची पॉलिसीची विमा रक्कम संपल्यास, आम्ही आपोआप तुमच्या उपयोगासाठी ती 100% पूर्ववत करतो. पॉलिसी वर्षाच्या दरम्यान पूर्वी ज्यासाठी दावा केला होता त्यासंबंधित आजारांसाठी 20% विमा रकमेचा उपयोग करता येतो आणि नवीन किंवा संबंधित नसलेल्या आजारासाठी 100% विमा रकमेचा उपयोग करता येतो.

### दावा नाही, होय बोनस मिळेल.

एखाद्या पॉलिसी वर्षामध्ये तुम्ही दावा केला नाहीत तर आम्ही कोणत्याही अधिक शुल्काशिवाय तुमच्या मुळ विमा रकमेच्या 33.33% इतका संचयित बोनस देतो. ओळीने 4 दावा मुक्त वर्षांच्या अखेरीस, तुम्ही संचयित बोनसचा उपयोग करून तुमची विमा रक्कम दुप्पट करण्यासाठी कॉल ऑप्शनचा पर्याय वापरू शकता. एकूण बोनस हा विमा रकमेच्या 100% पेक्षा अधिक असणार नाही.

### जलद पॉलिसी. जलद दावा. आमची खात्री.

तुमचे दस्तऐवज सादर करण्यात आले की तुमची पॉलिसी त्वरित जारी केली जाईल याची आम्ही खात्री देतो, परंतु पॉलिसी जारी करण्यामध्ये आम्हाला 10 कामकाजाच्या दिवसांचा उशीर झाल्यास, आम्ही आपल्याला ₹20,000 इतकी एकरकमी अधिक विमा रक्कम देऊ. दाव्याच्या वेळी रूग्णालयाचे बिल भरणे हा रुग्णालयात दाखल होण्यातील सर्वात महत्त्वाचा भाग असतो, आणि दाव्याची विनंती आणि दस्तऐवज सादर केले असल्यास, तरीसुद्धा आम्ही 6 कामकाजाच्या तासांच्या आत जर कॅशलेस दाव्याला प्रतिसाद देऊ शकलो नाही किंवा 21 दिवसाच्या आत दाव्याची प्रतिपूर्ती करू शकलो नाही ही तर आम्ही 1% दाव्याच्या रकमे इतकी, जास्तीत जास्त 6% इतकी रक्कम, देण्यास बांधील असू.

### मोफत विमा नुतनीकरण, कारण आम्ही काळजी घेतो.

पॉलिसी अंतर्गत समाविष्ट कोणीही प्रिय व्यक्तीला जर पहिल्यावेळी एखादा गंभीर आजार झाल्याचे निदान करण्यात आले तर:

- नमूद केलेल्या तीव्रतेचा कर्करोग
- ओपन चेस्ट कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्ट
- कायमस्वरूपी लक्षणांसह झटका
- सातत्यपूर्ण लक्षणांसह मल्टिपल स्क्लेरोसिस

तर त्यांच्या विम्याच्या संरक्षणाचे ताबडतोब मोफत नूतनीकरण करण्यात येईल.

*नियम व अटींच्या अधीन राहून, तुम्हाला एकतर कधीही डॉक्टर/मोफत हेल्पलाइन किंवा आरोग्याशी संबंधित माहितीसाठी पोर्टल आणि सेवा पुरवठादार किंवा आमच्या द्वारासेवा देण्यात येईल.

## आणि तुमचा निर्णय घेण्याची अजून 5 कारणे:

### स्वास्थ्य आवश्यक आहे आणि मोफत आहे*

जेव्हा तुम्ही आमचे पॉलिसीधारक होता तेव्हा आमच्या हेल्थ पोर्टल आरहेल्थ द्वारा तुम्हाला मोफत स्वास्थ्य सेवा दिल्या जातात, म्हणजे तुम्ही वैद्यकीय सल्ला मिळू शकता आणि डॉक्टरांचा दूरध्वनीवर अथवा ऑनलाइन सल्ला मिळवू शकता.

### आम्ही जवळ आहोत आणि कॅशलेस आहोत

सर्वोत्कृष्ट उपचारांसाठी आणि आजारातून बरे होण्यासाठी आम्ही आपल्याला भारतात कोठेही, तुमच्या घराच्या जवळ किंवा अजून दूर, कॅशलेस सुविधा देणाऱ्या आमच्या 7300+ रूग्णालयाच्या नेटवर्क पैकी कोणत्याही रुग्णालयाची निवड करण्याचे स्वातंत्र्य देतो.

### आम्ही आयुष्यभर सोबत करतो.

तुम्ही आमची आता किंवा नंतर कधीही निवड करा, बाहेर पडण्यासाठी कोणत्याही वयाची अट न ठेवता आमच्या पॉलिसीचे आयुष्यभर कधीही नूतनीकरण करता येते. ज्याचा अर्थ तुम्हाला जेव्हा गरज असते तेव्हा आम्ही नेहमीच तुमच्या सोबत असतो.

### वरिष्ठ नागरिक आणि विस्तारित कुटुंबासाठी संरक्षण

आम्ही 65 वर्षापेक्षा अधिक वयाच्या वरिष्ठ नागरिकांना (फक्त रू.3 लाख पर्यंत विमा रकमेसाठी) संरक्षण देतो आणि त्याचबरोबर आम्ही तुमची पत्नी, कन्या/मुलगा, आई/वडिल, भाऊबहिण, आजी/आजोबा, नात/नातू आणि सून/जावई यासह तुमच्या संपूर्ण कुटुंबाला संरक्षण देऊ करतो, कारण तुमचे त्यांच्यावर प्रेम आहे आणि त्यांना सर्वोत्कृष्ट संरक्षण देण्याची तुमची इच्छा आहे हे आम्हाला माहित आहे.

### वाचविलेला कर पुन्हा तुमच्या खिशात येतो

ह्या पॉलिसीत तुम्हाला करलाभ देखील मिळतो. तुम्ही भरलेली प्रिमियम आयकर कायदा, 1961 मधील कलम 80डी अंतर्गत कर वजावटीस पात्र आहे. ह्या लाभासंबंधी अधिक माहितीसाठी तुमच्या कर सल्लागाराचा सल्ला घ्या.

टीप: करलाभात बदल होऊ शकतात.



## सूट, सूट आणि अधिक सूट

### कार ग्राहकांसाठी सूट

तुम्ही रिलायन्स कार विमा ग्राहक असल्यास, तुम्हाला रिलायन्स प्रायव्हेट कार पॅकेज पॉलिसी ग्राहकांना दिली जाणारी प्रिमियमवर 5% विशेष सवलत दिली जाते.

### मुली आणि एकट्या महिलांसाठी सूट

तुम्ही जेव्हा तुमच्या लहान मुलीसाठी विमा घेता किंवा तुम्ही एकटी महिला असाल तर तुम्हाला मुलीसाठी किंवा एकट्या महिलेला दिली जाणारी प्रिमियमवर 5% विशेष सवलत दिली जाते.

### कौटुंबिक सवलत

जेव्हा तुम्ही फॅमिली फ्लोटरऐवजी कुटुंबातील एक पेक्षा अधिक सदस्यांचा एकाच पॉलिसीत व्यक्तिगत विमा काढता तेव्हा कुटुंबाच्या आकारानुसार पॉलिसीच्या प्रिमियमवर 5%/10% सूट दिली जाते.

### पॉलिसी कालावधीसाठी सूट

2 वर्षाच्या पॉलिसीसाठी 7.5%* सूट

टीप: सर्व सवलती मिळून एकुण 15% पेक्षा अधिक असणार नाही.

## दावा करण्याचे सुलभ टप्पे

तुमच्या हेल्थकार्डावर दिलेल्या 1800 3009 ह्या हेल्पलाईन क्रमांकाचा उपयोग करून रूग्णालयात दाखल झाल्याची माहिती आमच्या आरकेअर आरोग्य दावा संघाला कळवा.

आरकेअरकडे आवश्यक दस्तऐवज सादर करा.

**नेटवर्क हॉस्पिटल –** आरकेअर कॅशलेस फॅसिलिटीसाठी व्यवस्था करतील.
**नॉन–नेटवर्क हॉस्पिटल –** खर्चाच्या भरपाईच्या दाव्यांसाठी कृपया आमच्या पॉलिसीच्या लिखाणामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचा अवलंब करा.

**स्मार्ट चॉइस करण्यासाठी, आमच्याशी त्वरित येथे संपर्क साधा!**

| | |
|---|---|
| वेबसाईट | reliancegeneral.co.in |
| संपर्क | 1800 3009 (टोल फ्री)<br>022-4890 3009 (सशुल्क)<br>**022-33834185 (सशुल्कासह) – वरिष्ठ नागरिकांसाठी खास लाईन** |
| व्हॉटसअॅप | 74004 22200 |

**आमच्या इन्शूरन्स सल्लागाराशी संपर्क साधा**

ब्रोबॉट वेग हवा आहे? आमच्याबरोबर डिजिटल पद्धतीने काम करा.

RELIANCE Selfi
App Store
Google Play

**सूट देण्यास प्रतिबंध – विमा कायदा, 1938 मधील कलम 41, विमा कायदा (सुधारित) कायदा, 2015 द्वारा सुधारणा करण्यात आल्यानुसार**
कोणतीही व्यक्ती भारतातील जीवन किंवा मालमत्ता ह्यांच्याशी संबंधित जोखमींच्या संदर्भात विमा काढण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी किंवा तो सुरू ठेवण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतेही आमिष देण्याची परवानगी देणार नाही किंवा परवानगी देऊ करणार नाही, देय कमीशनमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही हिस्यात किंवा पॉलिसीवर दर्शविण्यात आलेल्या हफ्त्यात, कोणतीही सूट देऊ करणार नाही, किंवा पॉलिसी घेणारी, किंवा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कोणतीही व्यक्ती विमा कंपनीच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार किंवा तक्त्यानुसार परवानगी असलेल्या देण्यात येणाऱ्या सूट व्यतिरिक्त, कोणतीही सूट स्वीकारणार नाही. ह्या कलमातील तरतुदींची पूर्तता करण्याच्या बाबतीत एखाद्या व्यक्तीने काही हलगर्जीपणा केल्यास, त्याला दंड केला जाईल, जो ₹10,00,000/– पर्यंत वाढविला जाऊ शकतो.

फायदे, संरक्षण, नियम व अटी आणि वगळण्याचे मुद्दे यासंबंधी संपूर्ण माहितीसाठी, www.reliancegeneral.co.in वेबसाईटला भेट द्या आणि विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी विक्रीची माहिती पुस्तिका, प्रॉस्पेक्टस आणि पॉलिसीचे शब्दांकन काळजीपूर्वक वाचा. कर कायदे बदल होण्याच्या अधीन आहेत.

**आयआरडीएआय नोंदणी क्र. 103. रिलायन्स जनरल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय आणि कॉर्पोरेट कार्यालय: रिलायन्स सेन्टर, दक्षिण विंग, 4था मजला, पश्चिम दृतगती मार्गाजवळ, सांताक्रूज (पूर्व), मुंबई–400 055.कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U66603MH2000PLC128300. रिलायन्स हेल्थ गेन पॉलिसी UIN: RELHLIP21514V022021. वर दर्शविण्यात आलेले ट्रेड लोगोज हे अनिल धिरूभाई अंबानी व्हेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे आहेत आणि रिलायन्स जनरल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड द्वारा त्याचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. फक्त तिसऱ्या पक्षासाठी दर स्थिर आहेत.* कृपया कोणताही शब्द किंवा अर्थ स्पष्ट समजून घेण्यासाठी इंग्रजी माहितीपुस्तिका पहा*

आम्हाला येथे भेटा:

An ISO 9001:2015 Certified Company

RGI/MCOM/CO/HEATH GAIN /BR/VER.2.0/121020.